डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ,अकोला
कृषि तंत्र विद्यालय,बुलढाणा

सूचना का अधिकार

प्राचार्य
डॉ.एस.एम.जाधव
एम.एससी.पीएच.डी.(मृदा विज्ञान व कृषि रसायनशास्त्र)

दुरध्वनी क्र.(कार्या )९८५०३७३७६४
ईमेल : atsbuldana@gmail.com

जा.क्र./कृ.तं.वि.बु./ कार्या / ५५४ /२०२५ दिनांक : ३१ / ०१ / २०२५

## लिलाव सूचना

कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा या कार्यालयाचे भांडारातील निरुपयोगी प्रयोगशाळा साहित्य, लोखंडी आणि लाकडी साहित्याचा जाहीर लिलाव दि. १३/०२/२०२५ रोजी दुपारी ०३:०० वाजता कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा कार्यालयात करण्यात येणार आहे. तरी सदर निरुपयोगी प्रयोगशाळा साहित्य, लोखंडी आणि लाकडी साहित्य ज्यांना विकत घ्यावयाचे असतील त्यांनी लिलावाच्या वेळी लिलावाच्या अटी व शर्ती मान्य असल्यास अनामत रक्कम रु.२०००/- भरून नोंदणी करावी. सोबत आधार कार्ड प्रत सादर करावी. कार्यालयीन वेळेत साहित्य पहावयास मिळेल.सदर नियम अटी व शर्ती विद्यापीठच्या www.pdkv.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा

## लिलावाच्या अटी व शर्ती

०१. लिलावात निघालेले भंगार निरुपयोगी वस्तू, प्रयोगशाळा साहित्य, भांडी आणि लाकडी साहित्य यांचा लिलाव जसे आहे जिथे आहे या तत्वावर होईल.

०२. जुन्या भंगार साहित्याचा लिलावात समावेश असून त्याचा लिलाव करण्यात येईल.

०३.ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी दि. १३/०२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत रोखीने रक्कम भरणा करावे. तसेच दुपारी १२.०० वाजता नंतर कुठलीही अनामत रक्कम स्वीकारली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

०४. ज्यांनी अनामत स्वकम दि. १३/०२ /२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता च्या आत भरली असेल त्यांनाच बिडर नंबर देण्यात येईल व त्यांनाच लिलावाच्या ठिकाणी आधार कार्डच्या झेरॉक्ससह हजर राहता येईल व लिलावात भाग घेता येईल. इतर कोणत्याही व्यक्तीस लिलावात भाग घेता येणार नाही.

०५. लिलाव समितीचे सदस्य व संबंधीत कार्यालयीन कर्मचारी लिलावाचे ठिकाणी उपस्थित राहू शकतील व निरीक्षण करतील.

०६. लिलाव समिती बोलणी बोलणाऱ्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली मान्य असेल त्यांना लिलावाची बोली पाहून मान्यता देण्यात येईल व त्याबाबतचा अंतिम निर्णय गठित समिती घेईल,

०७. अपेक्षित किंमत आल्याशिवाय लिलावाची बोली मान्य करणे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील

०८. साहित्य बोली कायम झाल्यास व सदर वस्तूंच्या किंमती कायम झाल्यास किंमतीच्या ५०% (पन्नास टक्के) रक्कम त्याच दिवशी व उर्वरित ५०% ( पन्नास टक्के ) रक्कम लिलाव अंतिम झाल्यापासून तीन दिवसात भरावी लागेल. रक्कम न भरल्यास सदर लिलाव रद्द करण्यात येईल.

०९. बोली कायम झाल्यास संबंधित व्यक्तींनी सर्व साहित्य ताब्यात मिळताच स्वखर्चाने उचल करणे व वाहून नेण्याची त्यानंतर सर्व खर्चाची व जोखमेची जवाबदारी त्यांची स्वतःची असेल.

१०. लिलाव झालेल्या साहित्याची पूर्ण किंमत भरल्यानंतर सदर वस्तू खरेदीदाराने ३ दिवसाच्या आत विद्यापीठ परिसरातून स्वतःच्या ताब्यात घ्यावी अन्यथा सदर साहित्याची देखभालीची व गहाळ झाल्यास विद्यापीठाची जबाबदारी राहणार नाही , याची नोंद घ्यावी.

११. ज्यांची बोली अमान्य ठरली असेल त्यांना अनामत रक्कम परत करण्यात येईल.

१२. साहित्याची वाहतूक करताना विद्यापीठातील मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी खरेदीदाराची असेल.

१३. लिलावाबाबत काही तक्रार असल्यास त्याच दिवशी तशी लेखी स्वरुपात लिलावाच्या ठिकाणी लिलाव संपेपर्यंत द्यावी.अन्यथा तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. लिलावात सहभागी नसलेल्या व्यक्तीची तक्रार स्वीकृत करण्यात येणार नाही.

१४. लिलावात काहि अडचण अथवा वाद विवाद उत्पन्न झाल्यास गठीत समितीचा निर्णय अंतिम आणि सर्वांनाच बंधनकारक राहील.

१५. लिलाव कोणत्याही कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार गठीत समितीकडे राखून ठेवला आहे.

१६. लोखंडी साहित्याची विक्रीची बोली प्रति किलो दराप्रमाणे राहील. यामध्ये निरुपयोगी वस्तू, प्रयोगशाळा साहित्य, लोखंडी व लाकडी साहित्य इतर पातळ किंवा जाड लोखंडी साहित्याचा समावेश राहिल तसेच प्रत्यक्ष रक्कम अंतिम वजन परिमाणानुसार भरावी लागेल. सदर साहित्य उचल करणे, हमाली व वाहतुकीची जवाबदारी घेणाऱ्यांची राहील. तसेच वजन करणेची व त्यासाठी खर्चाची जवाबदारी सुद्धा राहील.

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय,बुलडाणा

AnyScanner